# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्थांमधील विविध अभ्यासक्रमांचे नुतनीकरण, नैसर्गिक विस्तार व निरंतर संलग्नीकरणासाठीचे प्रस्ताव सादर करणेबाबत.**

**शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी नुतनीकरण, नैसर्गिक विस्तार व निरंतर संलग्नीकरण प्रस्ताव सादर करण्याबाबत कार्यक्रम व सुचना खालीलप्रमाणे आहेत.**

| | |
|---|---|
| संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी निरंतर संलग्नीकरण नसलेल्या अभ्यासक्रमांचे नुतनीकरण/नैसर्गिक विस्तार मान्यता प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. यासाठी संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्थांनी नुतनीकरण व नैसर्गिक विस्ताराचे प्रस्ताव विद्यापीठाच्या विहीत नमुन्यात व प्रत्येक अभ्यासक्रमासाठी विहीत शुल्कासह दोन प्रतीमध्ये (एक मुळ प्रत) विद्यापीठास कार्यालयीन वेळेपुर्वी सादर करण्याची मुदत | दि.३१ ऑगस्ट, २०२१ पर्यंत |
| ज्या संलग्न महाविद्यालये/मान्यता प्राप्त संस्थांना निरंतर संलग्नीकरणासाठी प्रस्ताव सादर करावयाचे आहेत. त्यांनी प्रस्ताव विद्यापीठाच्या विहीत नमुन्यात विहीत शुल्कासह दोन प्रतीमध्ये (एक मुळ प्रत)विद्यापीठास कार्यालयीन वेळेपुर्वी सादर करण्याची मुदत | दि.३१ ऑगस्ट, २०२१ पर्यंत |

**सुचना :**

- महाविद्यालयांनी नुतनीकरण/नैसर्गिक विस्ताराचे सर्व अभ्यासक्रमांचे प्रस्ताव एकाचवेळी सादर करावेत.
- प्रस्ताव सादर करताना प्रस्तावाचा तपशिलाचा सोबतचा नमुना त्यामध्ये कोणताही बदल न करता महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या सही शिक्क्यानिशी सादर करणे आवश्यक आहे. त्यासाठी Plane Paper वापरावा (महाविद्यालयाचे Letter Head वापरू नये.)
- महाविद्यालयांनी नुतनीकरण, नैसर्गिक विस्तार, निरंतर संलग्नीकरण, प्रयोगशाळा मान्यता इ. बाबतचे प्रस्ताव सादर करताना महाविद्यालयांनी विद्यापीठ संकेतस्थळावर **Affiliation → Affiliation T2 Information List → Continuation & Natural Growth's various proposals formats** या ठिकाणी ठेवण्यात आलेल्या नमुन्यांचा वापर करणेत यावा. सदर प्रस्तावाचे रु.५००/- इतके शुल्क भरणे आवश्यक आहे. **(Buget Head A.2.R.4)**
- ज्या महाविद्यालयाकडे विद्यापीठाची मुळ प्रस्ताव पुस्तिका उपलब्ध आहे अशा महाविद्यालयांनी मुळ प्रस्ताव पुस्तिकेसह प्रस्ताव सादर करावा.
- दि. ०१ सप्टेंबर, २०२१ पासून रू.१२००/- प्रति महिना प्रती अभ्यासक्रम विलंब शुल्क आकारले जाईल.
- ज्या महाविद्यालयाच्या अभ्यासक्रमास विद्यापीठ अधिकर मंडळाने अटींच्या अधिन राहून संलग्नीकरणाचे नुतनीकरण दिलेले आहे. अशा महाविद्यालयांनी त्रुटी पुर्तता अहवाल विद्यापीठास सादर केल्याशिवाय शैक्षणिक वर्ष २०२२-२३ चा नुतनीकरणाचा प्रस्ताव स्वीकारला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.
- जी महाविद्यालये निरंतर संलग्नीकरण प्रस्ताव सादर करणार आहेत, त्यांनी पुर्वीच्या नुतनीकरण पत्रासह चालू नुतनीकरण प्रस्ताव व निरंतर संलग्नीरण प्रस्ताव एकाच वेळेस सादर करावेत.
- महाविद्यालयांनी वार्षिक संलग्नीकरण शुल्क भरले नसल्यास नुतनीकरण/नैसर्गिक विस्तार/ निरंतर संलग्नीकरण प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत.
- प्रस्ताव व शुल्क एकाचवेळी जमा करून घेतले जाईल.
- सद्यस्थितीत शासनाने कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्या साथरोग प्रतिबंधक कायदा १८८७ दि.१२/०३/२०२० पासून लागू केला आहे. याअनुषंगाने राज्यसरकारच्या मार्गदर्शक सुचनांनुसार महाविद्यालयांनी अंतिम मुदतीपुर्वी सर्व प्रस्ताव विद्यापीठास By Post सादर करून सहकार्य करावे.
- **उपरोक्त प्रस्तावांचे शुल्क सद्यस्थितीत विद्यापीठाच्या संकेतस्थळावरती Quick Link मेनूमधील Online Payment Gate Way या Link मधून General Receipt या Drop down menu मध्ये नोंदणी करून User id व Password तयार करून संलग्नीकरण प्रस्ताव पुस्तिका शुल्क व अभ्यासक्रम शुल्क भरण्याची कार्यवाही करावी. विहीत मुदतीनंतर Online शुल्क भरून प्रस्ताव सादर केल्यास विलंब शुल्क आकारण्यात येईल याची कृपया नोंद घेणेत यावी. तसेच सदर बाबत काही अडचणी उदभवल्यास विद्यापीठाशी संपर्क साधावा.**

*** (टिप :- सोबतच्या दि.२८ जुन, २०१८ च्या परिपत्रकामध्ये नमुद काही अभ्यासक्रम तसेच बृहत आराखडयामध्ये नव्याने समावेश करण्यात आलेल्या अभ्यासक्रमांचे शुल्क निर्धारित करण्याची बाब तसेच सदर शुल्कामध्ये कुलपतींनी मान्यता दिलेले संलग्नीकरण शुल्कासंदर्भातील सुधारीत दंडकातील शुल्क रचनेत वाढ लागु करण्याबाबत अधिकार मंडळासमोर विचारार्थ असल्याने याबाबत यथावकाश पुनश्च कळविण्यात येईल.)**

आपला विश्वासू,

(डॉ. विलास डी. नांदवडेकर)
कुलसचिव

संदर्भ क्र.: संलग्नता टी-२/ 643
दि. 17 JUL 2021
प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/ स्वायत्त महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

E:\Sm\Circular\Circular 2019.docx